जाहिर प्रकटन
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५.

पुणे महानगरपालिके मार्फत शहरी भागातील बेघर व निराश्रित लोकांसाठी शहरी बेघरांना निवारा प्रकल्प पुणे महानगरपालिका व संबंधित स्वयंसेवी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रकल्पाच्या संपूर्ण व्यवस्थापन, देखभालीकरीता

# स्वारस्य अभिव्यक्ती सूचना
# (EOI - Expression of Interest)

पुणे महानगरपालिके मार्फत शहरी भागातील बेघर व निराश्रित लोकांसाठी शहरी बेघर निवारा प्रकल्प सुरू असुन पुणे मनपा व संबंधित स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत संयुक्त प्रकल्प म्हणून तो चालविण्यात येत आहे. सबब या प्रकल्पाच्या संपूर्ण व्यवस्थापन, देखभालीकरीता अशासकिय/स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थांकडू जाहिर प्रकटन प्रस्ताव मागविण्यात येत आहे. याकामी तांत्रिक व आर्थिक बाबींची माहिती स्वतंत्रपणे पाकिटांमध्ये सादर करावीत. याकामी निविदा सादर करताना बयाणा रक्कम म्हणून रूपये १५,०००/- डी.डी.ने भरून प्रस्तावा सोबत सादर करावी. तसेच सदरच्या EOI ची माहिती (www.punecorporation.org) या संकेतस्थळावर EOI या सदराखाली पाहण्यास उपलब्ध आहे.

समाज विकास विभागाकडील खालील सहा ठिकाणी शहरी बेघर निवारा प्रकल्प सुरू करणेकामी प्रस्ताव मागविणेत येत आहेत.

| अ.क्र | ठिकाण |
|---|---|
| १. | खाशाबा जाधव मुलांची मनपा शाळा, शिवाजीनगर , पुणे (महिलांसाठी ) |
| २. | मार्कंडेय विद्यालय (जुनी नाना पेठ) नवीन भवानी पेठ, पुणे |
| ३. | मदर तेरेसा हॉल गाडीतळ, येरवडा क्षेत्रिय कार्यालय समोर, पुणे-५ |
| ४. | सेनादत्त सांस्कृतिक हॉल, सेनादत्त पेठ, सेनादत्त पोलिस चौकी मागे, पुणे -३० |
| ५. | दुधभट्टी केळभट्टी समाज मंदीर, बोपोडी, रेल्वे फाटक जवळ, पुणे |
| ६. | मोलेदिना वाहनतळ पार्किंग प्लाझा, पुणे स्टेशन, पुणे -३० |

**कामाची मुदत** :- ३ वर्ष.

**प्रस्ताव सादर करावयाची मुदत:-** दि. १५/०३/२०२४ पर्यंत

**प्रस्ताव जमा करणे व अधिक माहिती करीता संपर्काचे ठिकाण-**

समाज विकास विभाग कार्यालय
तळमजला, मुख्य इमारत, मनपा भवन,
शिवाजीनगर, पुणे -५

**सही/-**
**उप आयुक्त**
**समाज विकास विभाग**
**पुणे महानगरपालिका**

## प्रस्तुत निविदे कामी खालील बाबींचा सविस्तर माहितीचा तपशील तांत्रिक बाबींच्या निविदेच्या पाकिटांमध्ये सादर करावयाचा आहे

1. धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत संस्थेचे नाव, पॅन कार्ड नं., संपर्क क्र., कार्यकारणी, घटना समाविष्ट करावी. (Pls attach above documents) :-
2. संस्था चालक स्वतंत्र व्यक्ती आहे वा संचालक मंडळ आहे याबाबतचे स्पष्टीकरण व सबबची कागदपत्रे समाविष्ट करावी. (Pls attach above documents):-
3. संस्थेचे धर्मदाय आयुक्तांकडील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र व निती आयोगाचे www.ngodarpan.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी करून त्याचा रजिस्ट्रेशन आयडी क्रमांक जोडणे बंधणकारक आहे. – (Pls attach Registration Certificate ) --
4. सदरच्या कामाबाबतचा किमान ३ वर्षाचा कामाचा अनुभव व त्याची कागदपत्रे (कार्यादेश, अहवाल व इतर अनुषंगिक प्रमाणपत्रे ) Credentials (enclose separate sheet, if necessary.) तसेच संस्थेमार्फत सद्यस्थितीत सुरू असलेल्या प्रकल्पाबाबतची माहिती -
5. मागील लगतच्या ३ वर्षाचा ऑडीट अहवाल व मागील लगतच्या ३ वर्षाचा इन्कम टॅक्स क्लिअरन्स प्रमाणपत्र जोडणे बंधणकारक आहे. (Pls attach above documents)
6. संस्थेचा पतदर्शी दाखला (र. रू. १० लक्षच्या पुढील निविदेसाठी निविदेच्या २५% पतदर्शक दाखला सदर निविदे सोबत जोडणे बंधनकारक राहील. बँक सॉलवन्सी सर्टीफिकेट)
7. बयाणा रक्कम डी. डी. स्वरूपात भरून प्रस्ताव सोबत सादर करावी अन्यथा आपली निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.
8. अशासकिय/ स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थेस कळविण्यात येते कि, सदर स्वारस्य अभिव्यक्ती सुचना बाबतच्या सर्व अटी–शर्ती व सुचनाबाबत नमुद केलेली सर्व माहिती तपशीलामध्ये वाचून प्रत्येक पानावर स्वाक्षरी करावी व तो सादर करावा.
9. निविदाधारकाचे कुटुंबीय पुणे महानगरपालिकेमध्ये असल्यास, प्रस्ताव सादर करताना या संदर्भातील आवश्यक सर्व माहिती निविदाधारकाने परिशिष्ट 'ब' मधील प्रतिज्ञापत्राव्दारे सादर करणे बंधनकारक राहील, तसेच अशा माहितीमध्ये कुटुंबिय व्यक्तीचे नाव, हुद्दा, निविदाधारकाशी नाते इ. तपशिल स्पष्ट नमुद करण्यात यावा.
10. शासनाच्या / न्यायालयाच्या कायदेशीर प्रकरणात सदरची संस्था विवादीत नसल्याबाबत तसेच सदर संस्था यापुर्वी कोणत्याही शासकिय कार्यालया मार्फत /न्यायालयामार्फत काळ्यायादीत टाकण्यात आली नसल्याचे नोटराईज्ड हमीपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
11. प्रस्तावा सोबत FCRA रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र व 12 A 80 G प्रमाणपत्र सादर करावे.
12. सर्व कागदपत्रे अनुक्रमांक टाकून सादर करावीत.

13. सदर संस्थेस पुणे मनपा समाज विकास विभागामार्फत स्वारस्य अभिव्यक्ती सुचनेमधील व खात्यामार्फत वेळोवेळी ठरविण्यात येणाऱ्या अटी शर्ती मान्य असल्याचे संस्थेच्या लेटरहेडवर हमीपत्र जोडणे आवश्यक आहे.

**(टीप – मुद्दा क्र. ८,९ व १० चे कागदपत्रे निविदा ठेकेदार यांना पात्र केल्यानंतर मूळ प्रती खात्याकडे समाविष्ठ करणे बंधनकारक राहील. अन्यथा आपणांस त्याच क्षणी निविदेस अपात्र ठरविणेत येईल. याची खबरदारी घेणेत यावी.)**

सही/–
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

अशासकिय/ स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्था चालकाची
स्वाक्षरी व शिक्का व तारीख–
(Signature of the Consultant)
with Seal & Date:-

पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर, पुणे ४११००५.

## स्वारस्य अभिव्यक्ती सुचना भरू इच्छिणाऱ्या अशासकिय/स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थेकरीताची मार्गदर्शक सुची

1. अशासकिय/स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थेस सांगण्यात येते कि,अशासकिय/स्वयंसेवी/ सामाजिक/ सेवाभावी संस्थांनी बंद पाकिटामध्ये प्रस्ताव सादर करावा. प्रस्तावामध्ये संस्थेची पात्रता (आवश्यक कागदपत्रांसहित) तांत्रिक बाबीच्या तपशीलाबाबत दिलेल्या माहितीनुसार सर्व कागदपत्रे अ. क्र. टाकून सादर करणे आवश्यक आहे अन्यथा आपला प्रस्ताव ग्राह्य धरण्यात येणार नाही.

2. बयाणा रक्कम रूपये १५,०००/- भरल्याचा डी. डी. प्रस्तावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

3. अशासकिय/ स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थेस कळविण्यात येते कि, त्यांनी त्यांचे प्रकल्पाबाबत सादर करावयाचे आर्थिक प्रस्ताव दिलेल्या मार्गदर्शक सुचीनुसार सादर करावेत.

4. प्रकल्पाबाबत कोणतेही शंका असल्यास निविदा भरणे पूर्वी शंका-समाधान मा. मुख्य समाज विकास अधिकारी, समाज विकास विभाग तसेच कनिष्ठ अभियंता, समाज विकास विभाग यांचेकडून करून घ्यावेत व तद्नंतरच आपली निविदा सादर करावी. निविदा सादर केल्यानंतर आपली कोणतीही शंका/तक्रार याचे निवारण करणेत येणार नाही.

**सही/-**
**उप आयुक्त**
**समाज विकास विभाग**
**पुणे महानगरपालिका**

स्वाक्षरी आणि अशासकिय/ स्वयंसेवी/सामाजिक/सेवाभावी संस्थेचा शिक्का
व तारीख

## अ.) - प्रकल्पाची सर्व साधारण माहिती –

मा.सर्वोच्च न्यायालयातील रिट याचिका क्रमांक १९६/२००१ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने शहरी भागात बेघर व निराश्रित लोकांसाठी रात्र निवारे सुरू करण्याचे निर्देश सर्व राज्यांना दिलेले आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ६६ (३६) मधील तरतुदींन्वये देखील बेघर व निराश्रित लोकांसाठी निवाऱ्याची सोय करणे हे महानगरपालिकांच्या स्वेच्छाधीन कर्तव्यांचा एक भाग आहे.

उपरोक्त बाब विचारात घेऊन पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे मनपा क्षेत्रात बेघर व निराश्रित लोकांसाठी शहरी बेघर निवारा प्रकल्प कार्यान्वित आहेत. पुणे मनपा व संबधित स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत संयुक्त प्रकल्प या पध्दतीने प्रकल्प राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचे दैनंदिन व्यवस्थापन व देखभाल संबंधित स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याने करणेत येत असुन, प्रकल्पाच्या अनुषंगाने जागेची तसेच आवश्यक त्या पायाभूत सोयी-सुविधा यांची उभारणी महानगरपालिकेमार्फत करणेत आलेली आहे. शहरी बेघरांना निवारा प्रकल्पाबाबतची माहिती व मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे असुन त्यापुढे संस्थांनी प्रकल्पाच्या अनुषंगाने करावयाच्या विविध कामांचा तपशील नमूद केलेला आहे.

**ब**) समाज विकास विभागामार्फत उभारण्यात आलेल्या निवाऱ्यांबाबतची माहिती –

| अ.क्र. | शहरी बेघर निवारा प्रकल्प स्थळ | क्षमता | | आवश्यक पदनिहाय कर्मचारी |
|---|---|---|---|---|
| | | पुरूष | स्त्री | |
| १ | खाशाबा जाधव मुलांची मनपा शाळा, शिवाजीनगर , पुणे (महिलांसाठी ) | – | ६० | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-३<br>हाऊस किपर-१<br>सुरक्षा रक्षक-२ |
| २ | मार्कंडेय विद्यालय (जुनी नाना पेठ) नवीन भवानी पेठ, पुणे | ५० | ५० | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-५<br>हाऊस किपर-२<br>सुरक्षा रक्षक-२ |
| ३. | मदर तेरेसा हॉल गाडीतळ, येरवडा क्षेत्रिय कार्यालय समोर, पुणे-५ | २६ | – | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-३<br>हाऊस किपर-१<br>सुरक्षा रक्षक-२ |
| ४. | सेनादत्त सांस्कृतिक हॉल, सेनादत्त पेठ, सेनादत्त पोलिस चौकी मागे, पुणे -३० | ४२ | २० | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-५<br>हाऊस किपर-२<br>सुरक्षा रक्षक-२ |
| ५. | दुधभट्टी केळभट्टी समाज मंदीर, बोपोडी, रेल्वे फाटक जवळ, पुणे | २१ | – | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-३<br>हाऊस किपर-१<br>सुरक्षा रक्षक-२ |
| ६. | मोलेदिना वाहनतळ पार्किंग प्लाझा, पुणे स्टेशन, पुणे -३० | २५ | २२ | व्यवस्थापक-१<br>काळजीवाहक-५<br>हाऊस किपर-२<br>सुरक्षा रक्षक-२ |

**क)– शहरी बेघरांना निवारा प्रकल्पांबाबतची मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत –**

- पुणे महानगरपालिका क्षेत्रातील बेघर व निराश्रित लोकांची संख्या लक्षात घेवून त्या आधारे पुणे महानगरपालिकेमार्फत आवश्यक असणारी निवारा प्रकल्पांची संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामध्ये संस्थेमार्फत सादर करणेत आलेल्या प्रस्तावाप्रमाणे पात्र संस्थांपैकी काम देण्यास निश्चित करण्यात येणाऱ्या संस्थेस केवळ एकच प्रकल्प चालविणेस देण्यात येईल व इतर संस्थांना त्यांच्या इच्छेनुसार प्रतिक्षा यादीमध्ये ठेवण्यात येईल.
- सर्वसाधारणपणे एका शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये जागेच्या क्षमतेनुसार लोकांच्या निवासाची व्यवस्था करण्यात येणार असून प्रकल्पाच्या इमारतीच्या क्षमतेनुसार लोकांची निवासाची व्यवस्था करणे आहे. ज्या क्षेत्रामध्ये शहरी बेघर निवारा प्रकल्प करण्याचे नियोजन असेल तेथील बेघर व निराश्रित व्यक्तींचे सर्वेक्षणा अंती आढळलेल्या बेघर व निराश्रितांच्या संख्येनुसार त्या–त्या प्रकल्पात राहणाऱ्या लोकांची संख्या निश्चित करण्यात येते. तसेच संस्थेमार्फत करण्यात येणाऱ्या सर्वेक्षणानुसार व प्रकल्पामध्ये येणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार देखील व्यवस्था करणे आहे.
- शहरी बेघर निवारा प्रकल्पाचे ठिकाण मुख्यतः रेल्वे स्थानक, बस स्थानक, सार्वजनिक रुग्णालय किंवा मुख्य इस्पितळे, धार्मिक स्थळे, पर्यटन स्थळे, मोठी बाजार पेठ अशा वेगवेगळा गर्दीच्या ठिकाणी करण्यात येते.त्याअनुषंगाणे सदर संस्थेमार्फत वेळोवेळी उपरोक्त ठिकाणी माहिती प्रसारीत करणे व सर्वेक्षण करून सर्वेक्षणाचा अहवाल दर तीन महिन्यांनी मनपाकडे सादर करावा.

**ड .) महापालिकेच्या शहरी बेघरांना निवारा प्रकल्प या संयुक्त प्रकल्पाकरीता पुणे मनपा व संस्थेने करावयाच्या कामांचा तपशिलः–**

पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरामध्ये शहरी बेघर निवारा प्रकल्प सुरु असून, या प्रकल्पाचे संपूर्ण दैनंदिन व्यवस्थापन व देखभाल संस्थेंच्या माध्यमातून करणेत येत आहे. सदरहू शहरी बेघर निवारा प्रकल्प हा संयुक्त प्रकल्प म्हणून राबविण्यात यावयाचा असुन, पुणे महानगरपालिके मार्फत प्रकल्पाकरीता आवश्यक त्या खालील नमुद सोयी सुविधा तसेच प्रकल्प राबविण्याकरीता योग्य ती इमारत वा योग्य क्षमतेचा एक सुसज्ज हॉल, संडास बाथरुम व वॉश बेसिन इत्यादी सुविधेसहीत पुरविल्या जातात.

१. पलंग व गादी तसेच जागेची कमतरता असल्यास बहुमजली पलंग व्यवस्था.
२. बादली, चंबू, साबण इ. साहित्य पुरविण्यात येईल.
३. शहरी बेघरांना निवारा प्रकल्पाच्या वापरकर्त्यांकरीता सामान ठेवण्यासाठी कुलपासह कपाट व्यवस्था.
४. स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, गिझर, सुरक्षतेच्या दृष्टीने सी.सी.टी.व्ही. संच.
५. प्रथमोपचार पेटी
६. विद्युत व्यवस्था पंख्यांसहीत
७. अग्निशमन व्यवस्था.
८. प्रकल्पासाठी आवश्यक असे स्वयंपाक गृह.
९. शहरी बेघर निवारा प्रकल्पासाठी आरोग्य सुविधा देण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या दवाखाने/ इस्पितळांची माहिती उपलब्ध करून देणेत येईल.

खालील नमूद बाबींची पुर्तता (कामे) प्रकल्प चालविणाऱ्या संस्थेस प्रकल्पाचे व्यवस्थापन करण्याच्या अनुषंगाने करावी लागणार आहेत.

१. शहरी बेघर निवारा प्रकल्पाचे संपूर्ण दैनंदिन व्यवस्थापन व देखभाल संबधित स्वयंसेवी संस्थेस करावे लागणार आहे.
२. शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मग तो स्वतः आलेला असो वा पोलिसांनी वा अन्य सक्षम प्राधिकाऱ्यांनी आणलेला असो, त्याचे नाव, पत्ता, वय, धंदा इ. नोंद तेथे या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये संस्थेने नेमलेल्या सेवकामार्फत करुन घ्यावी लागणार आहे. याशिवाय सुरक्षेच्या कारणास्तव असे व्यक्तीचे छायाचित्र व स्वाक्षरी /अंगठा ठसा ही घेण्यात यावा.
३. नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्या व्यक्तीला (त्याला/तिला) झोपण्यासाठी अंथरुण/पांघरुण व्यवस्था उपलब्ध करुन दयावे आणि तेथे मोफत व दर आकारुन उपलब्ध करून देणेत येणाऱ्या सुविधांची माहिती द्यावी.
४. शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची येण्या-जाण्याच्या वेळेची न चुकता नोंद, नोंदवहीमध्ये करणे स्वयंसेवी संस्थेच्या प्रकल्पा मधील उपस्थित संस्थेच्या सेवकामार्फत ठेवणे अनिवार्य आहे.
५. शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये प्रवेश देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस बाहेर जाण्यासाठीची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेतल्या शिवाय शहरी बेघरांना निवारा प्रकल्प सोडता येणार नाही, हे संबधित स्वयंसेवी संस्थेने सुनिश्चित करावे.
६. सर्व प्रकारच्या मादक द्रव्यांचा/पदार्थांच्या सेवनास शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये सक्त प्रतिबंध असावा व याबाबतची काळजी संबंधित संस्थेमार्फत प्रकल्पावर नेमलेल्या व्यक्तीची पर्यायाने संबधित संस्थेची जबाबदारी राहील.
७. शहरी बेघर निवारा प्रकल्प परीसर पूर्णपणे धूम्रपान निषिध्द व तंबाखू मुक्त असावा.
८. शहरी बेघर निवारा प्रकल्पाची सर्वार्थीने सुरक्षा व्यवस्था (जबाबदारी) पूर्णतः संबंधित व्यस्थापन सांभाळणाऱ्या संस्थेची राहणार आहे.
९. कोणत्याही प्रकारच्या अनिष्ट घटना घडू नये म्हणून शहरी बेघरांना निवारा प्रकल्पाच्या ठिकाणी २४ तास सुरक्षा व्यवस्था करणे अनिवार्य आहे.
१०. शहरी बेघर निवारा प्रकल्पाकरीता संस्थेमार्फत प्रथमोपचार पेटी ठेवणे आवश्यक आहे.
११. शहरी बेघरांना निवारा प्रकल्पाचे संचलन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस तेथे निवासासाठी येणाऱ्या लोकांच्या आर्थिक-सामाजिक परिस्थितीची माहिती संकलित करणे आवश्यक आहे. यामध्ये अशा व्यक्तीचे शिक्षण, अवगत कौशल्य, आर्थिक-सामाजिक पार्श्वभूमी, उपजीविकेचे साधन इ. माहितीचा समावेश असणे गरजेचे आहे. जेणे करुन शासनाद्वारे किंवा महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी ते पात्र आहेत किंवा कसे? हे आकलन करणे शक्य होईल. तरी संबंधित संस्थेत शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये आलेल्या व्यक्तींबाबतची त्यांचा आर्थिक व सामाजिक तपशिला संबंधिची विहीत नमुन्यातील माहिती महापालिकेस पाठविणे बंधनकारक आहे.
१२. शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये येणाऱ्या मुलांसाठी शाळेत जाण्या योग्य वयाच्या मुलांना आवश्यक ती शैक्षणिक सुविधा ''बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९'' या कायद्याच्या तरतूदी प्रमाणे महापालिकेच्या शिक्षण व्यवस्थेत प्रवेश देण्याची व्यवस्था करावी लागेल.
१३. प्रत्येक शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये संबंधित प्रकल्प चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेने तेथे राहणाऱ्या उपभोक्त्यांना अतिशय वाजवी दर आकारुन चहा/कॉफी, नाश्ता, जेवण इ. ची सोय उपलब्धेप्रमाणे पुरवावी.

ही सोय शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये राहणाऱ्यांसाठी ना नफा ना तोटा या तत्वावर करावी, जेणे करुन शहरी बेघर निवारा प्रकल्पामध्ये राहणारी व्यक्ती या करीता प्रकल्पा बाहेर जाणार नाही.

१४. संबधित संस्थेने पुणे महानगरपालिकेस आवश्यक त्या विहीत नमुन्यामध्ये प्रकल्पाचा अहवाल वेळोवेळी वा मनपा मागणी करेल तेव्हा सादर करणे आवश्यक राहणार आहे. तसेच वेळोवेळी खात्यांच्या अधिकारी वर्गामार्फत करण्यात येणाऱ्या पाहणी निर्देशानुसार बदल अथवा आदेशाचे पालन होणे आवश्यक आहे.

१५. शहरी बेघरांना निवारा प्रकल्प चालवू इच्छिणाऱ्या संस्थेस पुढील नमुद पदांची प्रकल्पाकरीता आवश्यकता असल्याने त्यांची नेमणूक मनपाने विहीत केलेल्या अर्हतेत प्रकल्पाकरीता करावी **लागेल– व्यवस्थापक- एम.एस.डब्ल्यु पद्युत्तर परीक्षा उत्तीर्ण (प्रकल्प व्यवस्थापक), काळजीवाहक – पदवी परीक्षा उत्तीर्ण (वॉर्डन– निवासी प्रकल्प असल्याने), हाऊस किपर, सिक्युरिटी (वॉचमन)**. तसेच नेमणूक करण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती छायाचित्रासहीत पद व मोबाईल क्रमांक नमूद करून खात्यास कळवावी व वेळोवेळी करण्यात येणारे बदल किमान ७२ तासांच्या आत खात्याच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. सदर कर्मचाऱ्यांना अदा करणेत येणारे वेतन हे वेळोवेळी शासनाने/ मनपाने निश्चित केलेल्या धोरणाप्रमाणे अदा करण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेची राहील व याबाबत कोणत्याही प्रकारे पुणे मनपास लोषिस लागू देणार नाही याबाबतचे हमीपत्र १०० /– रूपयाच्या स्टॅम्प पेपरवर सादर करणेत यावे. तसेच संस्थेचे अध्यक्ष यांनी सदर संस्थेच्या कार्यवाहीचा अहवाल समक्ष खात्याकडे जमा करावयाचा आहे. तसेच संस्थेमार्फत याकामाकरीता इतर कोणत्याही संस्थेच्या कर्मचाऱ्यांमार्फत पुर्तता/पाठपुरावा करण्यात येवू नये. तसेच सदरची माहिती समाज विकास विभागामार्फत वेळोवेळी पाहणी करीता येणाऱ्या अधिकाऱ्यांना पाहण्यास उपलब्ध करून देण्यात यावी.

१६. पुणे महानगरपालिके मार्फत काही तांत्रिक कारणामुळे बिल अदा करणेस विलंब झाल्यास संस्था सदर प्रकल्प पुढे किमान तीन महिन्यांकरीता यशस्वीरित्या राबविणेसाठी आर्थिक दुष्ट्या सक्षम असणे आवश्यक आहे व त्याबाबत संस्थेची कोणतीही कारणमिमांसा पुणे मनपामार्फत ऐकून घेतली जाणार नाही तसेच सदरबाबतीत आपले मार्फत टाळाटाळ/असक्षमता आढळून आल्यास आपल्या संस्थेस कोणतेही कारण न देता आपलेकडील काम काढून घेण्याचे संपूर्ण अधिकार मा.महापालिका आयुक्त वा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी म्हणजेच उप आयुक्त/मुख्य समाज विकास अधिकारी यांचेकडे राखीव आहेत. याबाबत आपणांस कोणत्याही न्याय व्यवस्थेमार्फत दाद मागण्याचा हक्क राहणार नाही.

१७. शासनाने / मनपाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांचे तसेच अटी व शर्ती यांचे अनुपालन संस्थेमार्फत होणे गरजेचे आहे.

## ई.) स्वारस्य अभिव्यक्ती सुचना ( एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट) बाबतच्या अटी–शर्ती –

१. प्रस्ताव विहीत नमुन्यामध्ये सादर न केल्यास विना सुचना रद्द करणेत येईल.

२. प्रस्ताव सादर करावयाच्या शेवटच्या तारखेमध्ये वाढ करण्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही.

३. या संबधीची कोणत्याही स्वरुपामधील कायदेशीर कार्यवाही ही महाराष्ट्रामधील पुणे कार्यक्षेत्रामध्ये सुनावणीस घेण्यात येईल.

४. पुणे मनपाने कोणत्याही स्वरुपात कोणती प्रस्ताव स्विकारावी याबाबत तसेच कोणाचीही प्रस्ताव नाकारला तर याबाबत कोणासही कारणमिमांसा देण्यात येणार नाही.

५. प्रस्तुत प्रकरणी प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थांच्या कोणत्याही स्वरूपामधील अटी–शर्ती स्विकारल्या जाणार नाही.

६. प्रस्तुत प्रकरणी निवड करण्यात येणाऱ्या संस्थेचा पूर्वानुभव, संबंधित कामाची फर्म असल्यास त्याबाबतचा दाखला (रजिस्ट्रेशन), क्षमता, मनुष्यबळ, आर्थिक क्षमता अशा प्रकारच्या प्रकल्पामध्ये यापूर्वी काम केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल व त्याची माहिती खात्यास वेळोवेळी अवगत करावी.

७. प्रस्ताव परिपुर्ण असावा तसेच या सोबत सादर करावयाच्या कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

८. प्रस्तुत प्रस्ताव सादर करणेची शेवटची तारीख ही जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार असणार आहे.

९. प्रस्तुत प्रकरणी कोणत्याही प्रकारचा तांत्रिक वा आर्थिक वाद निर्माण झाल्यास याबाबत अंतिम निर्णय हा मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका वा ते प्राधिकृत करतील त्या अधिकारी(उप आयुक्त/ मुख्य समाज विकास अधिकारी) यांचा राहील.

१०. सर्व कागदपत्रे सुस्पष्ट व पृष्ठ क्रमांक टाकून सादर करावी. अन्यथा प्रस्ताव ग्राह्य धरला जाणार नाही.

११. प्रस्तुत प्रकल्पाकरीता स्वारस्य असणाऱ्या संस्थेने प्रस्ताव सादर करताना संस्थेचा सविस्तर तपशील, कार्यकारिणी, घटना, तीन वर्षाचे ऑडीटेड बॅलन्सशीट, पतदर्शी दाखला, संस्थेमार्फत सध्या सुरू असलेल्या प्रकल्पाचा थोडक्यामध्ये तपशील द्यावा.

१२. कोणत्या संस्थेस कोणता शहरी बेघर निवारा चालविण्यास देणेबाबतचे संपूर्ण अधिकार खाते प्रमुखांकडे राखीव आहेत.

१३. पुणे शहरातील रस्ता व पदपथावर राहणाऱ्या बेघर/भिक्षेकरी लोकांना निवारा प्रकल्पामध्ये आणणे हे संस्थेवर बंधनकारक राहील व याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेची राहील

१४. एका संस्थेस एकावेळेस एकाच शहरी बेघर निवाऱ्याकरीता कार्यादेश देण्यात येईल. तसेच सदर प्रकरणी प्रतिक्षा यादीतील संस्थेस कालावधी म्हणजेच तीन वर्षा करीता प्रतिक्षेवर ठेवणेत येईल. त्यानुसार प्रतिक्षा यादीवरील संस्थेची निवड प्रत्यक्ष कामकरीता करणेत आल्यास त्यावेळेस सदर संस्थेमार्फत बयाणा रक्कम रू. १५०००/– भरून घेणेत येईल. संस्थेचे काम असमाधानकारक आढळल्यास प्रतिक्षा यादीवरील संस्थेची निवड करण्यात येईल.

१५. सदर जाहिर सुचनेच्या शेवटच्या पानावर परिशिष्ठ अ नुसार संस्था निवड प्रक्रिया देणेत आलेली आहे. त्यानुसार संस्थेची निवड केली जाईल.

**फ.) वैधता -**

सदरहू विनाअटीची निविदेचा वैधता पिरिअड हा निविदा उघडल्यानंतर ३ वर्षांकरिता तसेच करारनाम्यात नमूद कालावधीकरीता एवढा राहील व वैधता पिरिअड पर्यंत संबंधित संस्थेने सादर केलेले दर कायम राहतील.

**ग.) प्रकल्पाबाबत संस्थेस अदा होणारे आर्थिक बाबींचा तपशील –**

संबंधित संस्थेस प्रथमत: प्रकल्पाकरीता स्वत: खर्च करावा लागेल व केलेल्या खर्चाचा तपशील व बिले संबंधित संस्थेने पुणे मनपाच्या समाज विकास विभागाकडे प्रतिमाह सादर करावयाची आहेत. पुणे शहरी भागातील बेघर व निराश्रित लोकांच्या संपूर्ण देखभालीकरीता खर्च होणारी रक्कम खात्याच्या सूचनेनुसार, करारनाम्यास अनुसरून योग्य पद्धतीने झाल्यासच आदा करणेत येईल.

**ह.) करारनामा –**

यशस्वी निवड झालेल्या संस्थेबरोबर रक्कम रू.५००/– च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करण्यात येईल.

सही/–
उप आयुक्त
समाज विकास विभाग
पुणे महानगरपालिका

संस्था चालकांची स्वाक्षरी व शिक्का व तारीख–
(Signature of the Consultant)
with Seal & Date:

*******************

## परिशिष्ट 'ब'

(अ पाकिट मध्ये खालील नमुन्यात रक्कम रू. १००/– चे स्टॅम्प पेपरवर हमी पत्र देणे आवश्यक आहे.)

## प्रतिज्ञापत्र

निविदा क्रमांक ..................................

निविदा रक्कम रू. ..................................

कामाच नावः– ..........................................................................................................................................

या कामासाठी प्रतिज्ञापत्राद्वारे मी. .........................................................................................................

प्रो.प्रा.श्री..................................राहणार(पत्ता)................................................ असे प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे की, आम्ही पुणे महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत ठेकेदार आहे./नाही.

माझे कोणतेही नातेवाईक पुणे मनपाच्या कोणतेही /................ ................ या विभागात कार्यरत नाहीत./आहेत श्री. ...................................................... हे या ................................. पदावर कार्यरत असून ते माझे .................................. आहेत./श्री. ................................ ....................... हे पुणे मनपाचे सभासद असून ते माझे .................................. आहेत

मी/ आम्ही निविदेतील सर्व अटी / नियमांचे अधीन राहूनच निविदा सादर करीत आहे /आहोत. वरील सर्व अटी माझेवर / आमचेवर बंधनकारक राहतील व यापैकी कोणत्याही आचारसंहितेच्या सूचनांचा व अटीचा भंग केल्यास माझे / आमचे निविदा रद्द होऊ शकते याची मला / आम्हांला जाणीव आहे. तसेच या कोणत्याही अटींचा भंग होऊन महानगरपालिकेस कोणताही आर्थिक नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी माझ्यावर / आमच्यावर राहील.

निविदेमधील कामाचे स्वरूप ऑर्डरमध्ये नमूद केल्याप्रमाणे पूर्ण करू व समाज विकास विभागास आवश्यक वाटल्यास सदर कामाची तपासणी करण्यास माझी/आमची हरकत नसून यासाठी आवश्यक फी भरण्यास तयार आहोत. निविदेच्या शर्तीमध्ये नमूद केलेल्या इसमाची सदर काम योग्य असल्याची खात्री करुन देईन / देऊ व त्यांची तशी खात्री पटल्यावरच आणलेल्या कामाचे मोजमाप व बिलाची पुढील व्यवस्था निविदेच्या शर्तीत नमूद केल्याप्रमाणे करीन / करु. कामकाज पसंत न पडल्यास मी / आम्ही सदरचे काम स्वखर्चाने करून देईन/देऊ.

मागे तपशिलात नमूद केलेल्या दरानेच महानगरपालिकेला मागे नमूद केलेल्या कॉन्टिटीपेक्षा जास्त काम/माल लागल्यास सदर कॉन्टिटीपेक्षा ५०% पर्यंत जादा काम/माल निविदेतील दरानुसार मी /आम्ही महानगरपालिकेला जादा काम/माल पुरविण्याचे कबूल करीत आहे/आहोत. मागे तपशिलात नमूद केलेल्या परिमाण (कॉन्टिटी) इतका काम/माल महानगरपालिकेने आमच्याकडून न केल्यास/खरेदी न केल्यास मी / आम्ही कोणतीही तक्रार करणार नाही.

माझा / आमचा G.S.T ______________________ आहे.

तरी वरील सर्व माहिती मी स्वतःअक्कल हुशारीने लिहून देत असून याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. सदर माहिती खोटी आढळल्यास टेंडरच्या कोणत्याही टप्प्यावर माझ्यावर कायदेशीर कारवाई करणेस व त्यामुळे मनपाचे होणाऱ्या नुकसान कारवाईस मी जबाबदार/तोषिस राहील.

निविदाधारकाचा शिक्का / सिल (निविदाधारकाची स्वाक्षरी / अंगठा दस्तूरासह)

परिशिष्ट अ

**BID EVALUATION METHODOLOGY**

Evaluation of the Technical and financial proposals will be based on **Quality cum Cost Based Selection (QCBS)** mode.

1. **Technical Evaluation**

The technical proposal shall be evaluated in two phases:

a. In the first phase, the Technical Proposals shall be evaluated on the basis of minimum eligibility criteria as mentioned above.

b. In the second phase, the shortlisted agency will be invited for presentation in (DAY-NULM) office.

**Technical Evaluation Criteria**

| # | Evaluation Criteria | Maximum Marks |
|---|---|---|
| 1. | Agency profile | 10 |
| 2. | Location of Agency<br><br>• = concern city: 15 marks<br>• Concern District: 10 Marks<br>• Maharashtra State: 5 marks | 15 |
| 2. | Proposed Approach, Methodology and Work Plan | 10 |
| 3. | Number of social developments projects completed/ongoing (on schedule) in at least three Municipal/Government departments (last three financial years)<br><br>• = 3 projects: 8 marks<br>• >=4 projects: 2 marks for each project | 10 |
| 4. | Number of projects in Management of Homeless Shelters for Urban Homeless<br><br>• = 1 Shelter: 5 marks<br>• 2 Shelters: 10 marks<br>• >= 3 shelters: 15 marks | 15 |

| Total | 60 |
|---|---|

### 3. Evaluation as per Quality and Cost Basis Selection (QCBS)

Threshold for short listing agencies for technical evaluation will be 70% of 60 marks (forty two marks). The technical evaluation carried out by (DAY-NULM) shall be final in all aspects. The financial proposals of only technically shortlisted consultants will be opened and will be ranked in terms of their total evaluated cost.

***Technical Points***

Technical Points will be awarded to the bidder based on their technical evaluation score. Technical Points will be evaluated as below:

If technical score scored by A, B & C is 32, 50 & 45 respectively, the Technical Points scored by A, B & C will be 53.33, 83.33 & 75 respectively.

| Agency | Technical Score | Technical Points |
|---|---|---|
| A | 32 | 53.33 |
| B | 50 | 83.33 |
| C | 45 | 75 |

***Financial Points***

In case of financial bid, agency with lowest fee/price will be given 100 as Price Point and Price Points of other two bidders will be calculated with formula as below: Lowest Price/Individual Price X 100. If price quoted by B is 90 (lowest one) and price quoted by A and C are 120 and 96 respectively, then Price Point of B = 100 and Price Point of A = 90/120 X 100 = 75 and price point of C = 90/96 X 100 = 93.75.

| Agency | Financial Quote/Price | Financial Points |
|---|---|---|
| A | 120 | 75 |
| B | 90 | 100 |
| C | 96 | 93.75 |

***Total Points***

For evaluating the Total Points, quality and cost basis selection shall be applied with below mentioned weights

| Parameters | Weight |
|---|---|
| Technical Points | 70% |
| Financial Points | 30% |
| Total | 100% |

The Total Points shall be calculated using the formula as (Technical Point x 0.70 + Price Point x 0.30) The Proposals/Bids securing the highest Total Points in the above evaluation will be ranked as H-1 followed by the proposals securing lesser marks as H2, H3, etc. Illustration of the same is as below

| Agency | Technical Points (T) | Financial Points (F) | Total Points (0.7T+0.3F) | Ranking |
|---|---|---|---|---|
| A | 53.33 | 75 | 59.83 | H3 |
| B | 83.33 | 100 | 88.33 | H1 |
| C | 75 | 93.75 | 80.63 | H2 |

The agency with the Highest ranking (H1) shall be recommended for project. In scenario of a tie in Total Points, agency with higher Technical Points will be ranked higher.